शनिवार दि. १४ मार्च २०१५

टाइम्स

# दोडामार्ग महाविद्यालयात २६ व २७ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

दोडामार्ग, १३ मार्च (प्रतिनिधी)- येथील नवनिर्माण शिक्षण संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय सामाजिक अनुसंधान परीषद मुंबईच्यावतीने २६ व २७ मार्च रोजी पश्चिम घाट जागतिक वारसा, पर्यावरण आणि विकास या विषयावर दोन दिवशीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. युनेस्कोने अलिकडेच पश्चिम घाटाचे जागतिक पर्यावरणीय दृष्ट्या महत्व लक्षात घेऊन जागतिक वारसा यादीत पश्चिम घाटाचा समावेश करता येईल याचा अभ्यास, मनन चिंतन व्हावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवुन चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

पश्चिम घाटासंदर्भात माधव गाडगीळ समिती व कस्तुरीरंगन समिती यांच्या बहुचर्चित अहवालावरही तज्ञ आपली मते मांडणार आहेत. शिवाय पश्चिम घाटाचे पर्यावरण अबाधित ठेवुन त्याचा सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने कसा लाभ घेता येईल यावरही चर्चा होणार आहे. या चर्चासत्रामध्ये पालघर कॉलेजचे प्राचार्य डॉ.हेमंत पेडणेकर, डॉ.अंबादास जाधव, (मुंबई विद्यापीठाचक भुगोल विभागप्रमुख), डॉ.नंदकुमार सावंत (भुगोल विभाग प्रमुख चौगुलेकॉलेज गोवा), डॉ.प्रविण कुमार रथ (भुगोल विभागप्रमुख शासकीय कॉलेज गोवा), डॉ.अभय पाटील (आर.पी.डी.कॉलेज बेळगांव), डॉ.मीना पोद्दार (भुगोल विभागप्रमुख शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर) आदी मान्यवर तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ पश्चिम बंगाल बरोबरच देशाच्या अन्स राज्यातील १०० पेक्षा अधिक पर्यावरण अभ्यासक यामध्ये सहभागी होणार आहेत.

चर्चासत्राचा प्रारंभी गुरुवार २६ मार्च २०१५ रोजी सकाळी १० वाजता होणार असून या चर्चासंत्राच्या उद्घाटनासाठी गोव्याचे मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांना निमंत्रित करण्यात आले आहे. तर शुक्रवार २७ मार्च रोजी होणाऱ्या समारोप समारंभास पर्यावरण चळवळीतील अग्रणी प्राचार्य डॉ.एम.आय.बाचुळकर उपस्थित राहणार आहेत. चर्चासत्राचे समन्वयक म्हणुन प्रा.डॉ.डी.पी.गाथाडे तर सहसमन्वयक म्हणुन प्रा.एस.एन.जाधवं हे जबाबदारी पार पाडणार आहेत.

चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदणीसाठी प्रा.एस.एन. जाधव (९८८१५६०५९६) व श्रीपाद पाडगांवकर (९४२३६८७७४४) यांच्याशी संपर्क साधावा या चर्चासत्रात देशाच्या विविध भागातील प्राध्यापक, पर्यावरण तज्ञ या चळवळीतील कार्यकर्ते व पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून स्थानिक पर्यावरणप्रेमीनीही या चर्चासत्राचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील यांनी केले आहे.